**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.**

**'STARS' प्रकल्पांतर्गत**

# पायाभूत चाचणी २०२३-२४

## इयत्ता - चौथी : विषय - मराठी (प्रथम भाषा)

## शिक्षकांसाठी सूचना आणि उत्तरसूची

'STARS' प्रकल्पांतर्गत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राज्यस्तरावरून विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी - १ व संकलित मूल्यमापन चाचणी - २ अशा तीन शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने संबधित इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही याची पडताळणी या चाचण्यांद्वारे करण्यात येईल. राज्यस्तरावरून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात सुरुवातीस इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्तींवर आधारित इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी घेण्यात येत आहे. सदर चाचणीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी मागील इयत्तेमधील अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केल्या आहेत हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

**चाचणीचे स्वरूप :**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इयत्तानिहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्तींचे विकसन करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक ही अध्ययन निष्पत्तींच्या आधारे तपासली जाणार आहे. या पुढील काळात होणारी सर्व राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणे व राज्य अध्ययन संपादणूक सर्वेक्षणे ही अध्ययन निष्पत्तींवर आधारित असणार आहेत, त्यामुळे पायाभूत चाचणी विकसित करताना मागील इयत्तांच्या विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती विचारात घेतल्या आहेत.

**तोंडी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) तोंडी चाचणीसाठी काही पूरक साहित्य आवश्यकता असल्यास (उदा. शब्द कार्डे, वाक्य कार्डे, चित्रे इ.) असे साहित्य पुरेशा संख्येने चाचणी सुरू करण्यापूर्वी तयार करून ठेवावे.

२) तोंडी चाचणी घेत असताना चित्र निरीक्षण, श्रवण, वाचन इ. कृतींसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा.

३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात येण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी.

४) वयोगटानुसार विद्यार्थ्यांच्या घरच्या/परिसर भाषेचा स्वीकार करावा.

५) तोंडी प्रश्नांचा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वैयक्तिक स्वरूपात घ्यावा व प्रतिसादानुसार लगेचच प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्राप्त गुणांची नोंद दिलेल्या गुणनोंद तक्त्यात करावी, अर्धा गुण देऊ नये.

**लेखी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) इयत्ता तिसरी व चौथीच्या मुलांसाठी एक एक प्रश्न वाचून दाखवावा, काय करावयाचे आहे, हे समजावून सांगावे व तो प्रश्न सोडवायला सांगावा. याप्रमाणे एक एक प्रश्न पूर्ण करत चाचणी सोडवून घ्यावी.

२) इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना आवश्यकता आहे त्यांना प्रश्न समजावून सांगावा. मात्र उत्तराचा संकेत देऊ नये.

३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात येण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी. शाळेच्या मधल्या सुट्टीची वेळ झाल्यास अथवा मुले कंटाळली आहेत असे वाटल्यास थोडा वेळ थांबून नंतर उरलेली चाचणी घेण्यास हरकत नाही.

४) लेखी चाचणीमध्ये उत्तरे लेखनासाठी आवश्यक जागा देण्यात आलेली आहे.

५) संबंधित विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी आपल्या वर्गात ही चाचणी घ्यावयाची आहे व ती तपासावयाची आहे.

६) प्रत्येक विद्यार्थ्याची सद्य:स्थितीमध्ये नेमकी संपादणूक कशी आहे, हे पाहणे हा मुख्य उद्देश चाचणी घेण्यामागे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत सदर चाचणी घेण्याबाबतचा निर्णय संबंधित विद्यार्थ्यांचा दिव्यांग प्रकार लक्षात घेऊन शाळा मुख्याध्यापक, शिक्षक यांनी घ्यावा. आवश्यकतेनुसार विशेष तज्ज्ञ किंवा विशेष शिक्षक यांची मदत घ्यावी.

७) प्रात्यक्षिक/तोंडी आणि लेखी चाचणीचा गुणनोंदणी तक्ता चाचणीच्या सुरुवातीला देण्यात आलेला आहे. प्रश्ननिहाय गुणांची नोंद सदर तक्त्यात शिक्षकांनी करावयाची आहे. अर्धा गुण देऊ नये.

८) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणांचे विश्लेषण करून वर्गस्तरावर गरजेनुरूप कृती-कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करावी.

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ३० | ४० |

**तोंडी चाचणी**

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. १) | **खाली दिलेल्या चित्राचे निरीक्षण कर व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 03.01.03 | ५ |
| | खाली दिलेल्या चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे व शिक्षकांनी प्रश्न विचारावेत. | | |
| | अ) मुलगा झाडांना पाणी देत आहे यासारखे समर्पक उत्तर दिल्यास. | | १ |
| | आ) चित्रातील मुलगा झाडाला पाणी घालण्यासाठी झारीचा वापर करत आहे./ झारीने पाणी घालत आहे./झारी यांपैकी कोणतेही उत्तर दिल्यास. | | १ |
| | इ) विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे किंवा त्यापेक्षा वेगळी समर्पक दोन घोषवाक्ये तयार केल्यास, प्रत्येक घोषवाक्यास १ गुण.<br>जसे, - झाडे लावा, झाडे जगवा.<br>कावळा करतो कावऽऽ कावऽऽ,<br>माणसा माणसा झाडे लाव इत्यादी. | | २ |
| | ई) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घटनाक्रम लिहिलेल्या शब्दपट्ट्या द्याव्यात व विद्यार्थ्यांकडून घटनाक्रम लावून घ्यावा.<br>बी लावणे, अंकुर फुटणे, रोप वाढणे, फुले येणे, फळे येणे याप्रमाणे घटनाक्रम लावल्यास १ गुण. | | १ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. २) | **दिलेला संवाद वाच व खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 03.01.10 | ५ |
| | खालील संवाद विद्यार्थ्यांना वाचण्यास सांगावे व नंतर प्रश्नांची तोंडी उत्तरे विचारावीत.<br>अ) संवादाच्या वाचनाचा दर्जा पाहून गुणदान करावे.<br>आ) चेंडू घेण्यासाठी बंडू दप्तर शोधत आहे./चेंडूसाठी यांपैकी कोणतेही उत्तर दिल्यास.<br>इ) वरील संवादात दोन व्यक्ती सहभागी आहेत./दोन व्यक्ती यांपैकी कोणतेही उत्तर दिल्यास.<br>ई) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न कसा तयार करावा याचे एक उदाहरण द्यावे.<br>जसे की, - बंडू तुझा चेंडू कोठे आहे?<br>खालीलप्रमाणे कोणताही एक समर्पक प्रश्न सांगितल्यास.<br>१) बंडू तू काय शोधत आहेस?<br>२) बंडू तू दप्तर का शोधतो आहेस?<br>३) बंडू तू दप्तरात काय ठेवले आहेस?<br>४) बंडू तुला दप्तर कोण शोधून देणार आहे? | | २<br>१<br>१<br>१<br>१ |
| | **लेखी चाचणी** | | |
| प्र. ३) | **खालील चित्राचे निरीक्षण कर व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 03.01.04 | ४ |
| | अ) मुलगा भाजी निवडत आहे./भाजी निवडत आहे. असे किंवा इतर समर्पक उत्तर लिहिल्यास.<br>आ) चिरण्यापूर्वी या उत्तरास गोल केल्यास.<br>इ) विद्यार्थ्यांनी ते घरात करत असलेली कोणतीही दोन कामे सांगितल्यास प्रत्येकी १ गुण. | | १<br>१<br>१ |
| प्र. ४) | **खालील उताऱ्याचे वाचन कर व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 03.01.06 | ५ |
| | अ) कचरा कुजतो/सडतो त्यामुळे कचऱ्याचा घाण वास येतो. असे समर्पक उत्तर लिहिल्यास.<br>आ) विद्यार्थ्यांनी उताऱ्यावर आधारित समर्पक दोन प्रश्न तयार केल्यास प्रत्येक प्रश्नास १ गुण द्यावा.<br>इ) पीके चांगली येतात, जमीन सुपीक होते असे समर्पक उत्तर दिल्यास.<br>ई) पवन शब्दाला गोल केल्यास. | | १<br>२<br>१<br>१ |
| प्र. ५) | **खाली दिलेल्या कवितेच्या ओळी वाच. त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 03.01.09 | ४ |
| | अ) दुडुदुडु या शब्दाला किंवा २ या क्रमांकाला गोल केल्यास<br>आ) बाळ या शब्दाला किंवा ३ या क्रमांकाला गोल केल्यास<br>इ) ती चिऊ या शब्दाला किंवा ४ या क्रमांकाला गोल केल्यास.<br>ई) 'मैना' या नामाचा वापर करून एक समर्पक वाक्य लिहिल्यास | | १<br>१<br>१<br>१ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ६) | **चित्र पाहा. चित्रातील गंमत तुझ्या शब्दांत लिही.** | 03.01.11 | २ |
| | विद्यार्थ्यांनी चित्रातील गमतीचे दोन ते तीन वाक्यांत वर्णन केल्यास.एका वाक्यात वर्णन केल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. ७) | | 03.01.12 | ४ |
| | अ) खेळाच्या मैदानावर मुलांनी ज्या सूचनांचे पालन करावे असे तुला वाटते त्या दोन सूचना लिही.<br>विद्यार्थ्यांनी खेळाच्या मैदानावर पाळावयाच्या दोन समर्पक सूचना लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक सूचना लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | आ) खालील सूचना तुला कोठे वाचावयास मिळतात त्या ठिकाणाचे नाव लिही.<br>१) वर्ग, शाळा, दवाखाना, वाचनालय याप्रमाणे किंवा इतर योग्य ठिकाणाचे नाव लिहिल्यास. | | १ |
| | २) बाग, (गार्डन) शाळेची बाग याप्रमाणे किंवा इतर योग्य ठिकाणाचे नाव लिहिल्यास. | | १ |
| प्र. ८) | **सूचनेप्रमाणे लेखन कर.** | 03.01.13 | ५ |
| | अ) विद्यार्थ्यांनी योग्य ठिकाणी विरामचिन्हे वापरून वाक्य लिहिल्यास योग्य उत्तरास<br>१) मग तुला घाबरायचं काय कारण? असे वाक्य लिहिल्यास (एक चिन्ह) | | १ |
| | २) बाई म्हणाल्या, ''हे तर पान आहे.'' असे वाक्य लिहिल्यास (दोन चिन्हे)<br>वाक्यात फक्त एक चिन्ह (स्वल्पविराम किंवा पूर्णविराम दिल्यास)<br>आ) स्वल्पविराम (,) हे चिन्ह वापरून एक वाक्य तयार करून लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | इ) दिलेल्या सूचनेप्रमाणे बदल करून खालीलप्रमाणे समर्पक प्रश्नार्थी वाक्य लिहिल्यास उदा., ते कोठे गेले? गावाला कोण गेले? याप्रमाणे | | १ |
| प्र. ९) | **खालील बातमी काळजीपूर्वक वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही.** | 03.01.14 | ६ |
| | अ) विद्यार्थ्यांनी 'बालसाहित्य संमेलन' या शब्दांना गोल केल्यास किंवा ३ पर्याय क्रमांकाला गोल केल्यास. | | १ |
| | आ) १) श्रीमती स्वाती राणे/स्वाती राणे याप्रमाणे उत्तर लिहिल्यास. | | १ |
| | २) कु. रचना रमेश माने/रचना माने याप्रमाणे उत्तर लिहिल्यास. | | १ |
| | ३) ज्ञानदीप शाळा कर्जत/ज्ञानदीप शाळा याप्रमाणे उत्तर लिहिल्यास. | | १ |
| | इ) विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनाच्या तयारीवर आधारित दोन-तीन समर्पक वाक्ये लिहिल्यास.<br>एक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>जसे - गाणे पाठ करेन, वेशभूषेकरिता कपडे शिवून घेईन/विकत घेईन, संवाद पाठ करेन, नृत्याचा सराव करेन इत्यादी. | | २ |